# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२३ / अग्रहायण २७, १९४५ (शके)**

**(१) सहकार मंत्री**
**(२) महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री**
**(३) वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री**
**(४) आदिवासी विकास मंत्री**
**(५) कृषी मंत्री**
**(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री**
**(७) मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३८**

---

### महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या अकोला येथील विभागीय कार्यालयाच्या गोदामातून लाखो रुपयांचा किटकनाशकांचा साठा गायब झाल्याबाबत

**(१) * २१५२९ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या अकोला येथील विभागीय कार्यालयाच्या गोदामात ठेवलेला किटकनाशकाचा रुपये ३८ लाख ९१ हजार किंमतीचा साठा गायब झाल्याचे दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गोदामाचे लिपिक तथा भांडारपाल यांनी रुपये ३८ लाख ९१ हजार किंमतीचा साठा पुरविल्याबाबत बनावट चलने सादर केल्याचे विभागीय अधिकाऱ्यांनी केलेल्या साठा पडताळणीत आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच चौकशीच्या अनुषंगाने सदर दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) अंशत: खरे आहे. सत्य शोधन समितीच्या दिनांक २०/१०/२०२२ च्या अहवालानुसार निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्या दिनांक ०४/०५/२०२३ च्या आदेशान्वये श्री.वाशिमकर यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच श्री.वाशिमकर यांच्याविरुध्द दिनांक ०४/०५/२०२३ अन्वये दोषारोपपत्र बजावून विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. श्री.मंदार वाशिमकर, लिपिक तथा भांडारपाल यांनी केलेल्या अफरातफरीबाबत महामंडळाचे अकोला येथील विभागीय व्यवस्थापक यांनी एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, अकोला येथे FIR क्रमांक ०२५२/२०२३ हा दिनांक २९/०७/२०२३ रोजी दाखल केला आहे. श्री.वाशिमकर यांनी जिल्हा सत्र न्यायालय, अकोला येथे अटक पूर्व जामिन मिळण्याकरीता दाखल केलेला अर्ज मा.न्यायालयाकडून फेटाळण्यात आला होता. तद्नंतर मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाकडून क्रिमिनल ॲप्लीकेशन (अेबीए) क्रमांक ६२२/२०२३ मध्ये दिनांक १५/०९/२०२३ च्या आदेशान्वये श्री.वाशिमकर यांचा जामिन अर्ज मंजूर केला आहे. याबाबत पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैजापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची नावे लाभार्थ्यांच्या यादीतून वगळण्यात आल्याबाबत

**(२) * २१५५९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैजापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यामध्ये माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत सततच्या पावसामुळे शेतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी तयार करण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या यादीमधून २७ हजार शेतकऱ्यांची नावे वगळण्यात आल्याची बाब दिनांक २६ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सततच्या पावसामुळे तालुक्यातील ८२ हजार २६२ हेक्टर क्षेत्रातील शेतीचे नुकसान झाले असून नुकसान भरपाई मिळण्यासाठी रुपये १११ कोटींच्या निधीची मागणी महसूल विभागाकडून शासनाकडे करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तहसिल कार्यालयातून गावनिहाय नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या याद्या पाठवून त्यास मंजुरी मिळूनही लाभार्थ्यांना ई-केवायसी करुन अनुदान वितरित करण्याच्या पध्दतीमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या पिकांच्या नुकसान भरपाईची रक्कम त्यांना देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाकडून एकीकडे ‘ शासन आपल्या दारी ‘ या कार्यक्रमाच्या जाहिरातीवर कोटयावधी रुपयांचा खर्च करण्यात येत असताना शेतकऱ्यांना मात्र त्यांच्या पिकांची नुकसान भरपाई मिळण्यासाठी ११ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी होऊनही तहसिल कार्यालयात कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी हेलपाटे मारावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वैजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांची नुकसान भरपाई मिळण्यासाठी गावांमध्ये विशेष योजना राबवून ई-केवायसीसाठी आवश्यक कागदपत्रे शेतकऱ्यांकडून जमा करुन सर्व लाभार्थ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) नाही, पात्र बाधित शेतकऱ्यांपैकी एकही शेतकरी अनुदानापासून वगळल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) हे खरे नाही.

(५) वैजापूर तालुक्यातील ई-केवायसी न केलेल्या १४१६५ शेतकऱ्यांनी ई-केवायसी करण्याकरीता त्यांच्यामध्ये जागृती करण्यासाठी गाव पातळीवरील क्षेत्रिय यंत्रणेद्वारे कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाने नियमबाह्य पध्दतीने कर्जाचे वाटप केल्याबाबत

**(३) * २१७२१ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेत ५६.१९ कोटी रुपयांच्या एकूण कर्जावर सहकार आयुक्तांनी २९ अ एक अन्वये नेमलेल्या तपासणी अधिकाऱ्यांनी आक्षेप नोंदविला असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाने नियमबाह्य पध्दतीने कर्जाचे वाटप केले असून सदर प्रकरणे थकीत झाल्याची दिसून आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व प्रकारच्या नियमांना डावलून काही विशिष्ट लोकांना व त्यांच्या कुटुंबियांना वेगवेगळ्या नावाने कर्जवाटप करून संचालक मंडळाने अनियमितता केल्याप्रकरणी मंडळाला जबाबदार धरण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदर बँकेच्या संचालक मंडळावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) होय.

(२), (३) व (४) जिजाऊ कमर्शियल को-ऑप बँक, अमरावती या बँकेबाबतच्या विविध तक्रारींच्या अनुषंगाने सहकार आयुक्तांनी दिनांक १०/११/२०२२ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८९ (अ) अन्वये तपासणीसाठी प्रादेशिक उपसंचालक, (साखर), अमरावती यांची नियुक्ती केली असून त्यांनी दिनांक १८/०८/२०२३ रोजी तपासणी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालामध्ये कर्ज मंजूर प्रकरणामध्ये पुरेसे तारण न घेणे, कर्जदाराची क्षमता न पाहता कर्ज देणे, संपूर्ण कर्ज रक्कम उचल देणे, कमी व्याजदराने कर्ज मंजूर करणे, शासन मान्यता न घेता एक रकमी कर्ज परतफेड योजना राबविणे इत्यादीमध्ये अनियमितता आढळून आल्याने सदर बँकेची महाराष्ट्र सहकारी संस्था

अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी करण्यासाठी दिनांक ०९/११/२०२३ रोजीच्या आदेशान्वये सहकार आयुक्तांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जि.अमरावती यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली असून चौकशीची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धारासूर (ता.गंगाखेड, जि.परभणी) येथील प्राचीन गुप्तेश्वर मंदिराच्या दुरूस्तीची तसेच इतर आवश्यक कामे करण्याबाबत

**(४) * २१७५६ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धारासूर (ता.गंगाखेड, जि.परभणी) येथील प्राचीन गुप्तेश्वर मंदिर हे भाविकांचे श्रध्दास्थान असून या ठिकाणी भेट देणाऱ्या भाविकांना रस्ते, पिण्याचे पाणी, इ. मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासह प्राचीन मंदिराचे जतन व संवर्धन करण्याकरीता पुरातत्व विभागाकडून जवळपास २८ कोटी रूपयांची कामे करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कामे सुरू असतानाच या मंदिराची मोठी शिळा घसरून मंदिराची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याची बाब माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू मंदिर हे प्राचीन असल्याने त्याचे योग्य पध्दतीने जतन व संवर्धन करण्याच्या अनुषंगाने या मंदिराच्या दुरूस्तीची तसेच इतर आवश्यक कामे करुन सदर मंदिर भाविकांकरीता कधी पासून दर्शनासाठी खुले करण्यात येणार आहे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन राज्य संरक्षित स्मारकाच्या फक्त जतन व संवर्धनाच्या कामासाठी पहिल्या टप्प्यात रुपये १४.९५ कोटी इतक्या रकमेची कामे हाती घेण्यात आली आहेत. तसेच पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाल्यानंतर या स्मारकाच्या जतन व संवर्धनासाठी दुसऱ्या टप्प्याचे रुपये १३.९८ कोटी इतक्या रकमेची कामे हाती घेण्याचे नियोजित आहे.
(२) अंशत: खरे आहे.

दिनांक २८/०९/२०२३ रोजी या मंदिराची शिळा निखळली होती. तथापि, कोणत्याही प्रकारची दुरावस्था झालेली नाही.
(३) प्रश्नाधीन राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन व संवर्धनासाठी पहिल्या टप्प्याचे काम सध्या सुरू असून हे काम पूर्ण होण्यासाठी अंदाजे २ वर्षाचा कालावधी अपेक्षित आहे. तथापि, मंदिराच्या जतन दुरूस्तीचा कामामुळे भाविकांना दर्शनाची कोणतीही अडचण येवू नये, म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांना विश्वासात घेऊन भगवान महादेवाच्या पिंडीची प्राणप्रतिष्ठा मंदिर परिसरात करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील तसेच अमरावती विभागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत

**(५) * २२२०२ श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सचिन अहिर, श्री.प्रसाद लाड, अॅड.अनिल परब, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकरी आत्महत्येत अमरावती, यवतमाळ व बुलढाणा हे जिल्हे राज्यात पहिल्या तीन क्रमांकात असून अमरावती विभागात गत १० महिन्यांच्या कालावधीत राज्यातील सर्वाधिक म्हणजेच तब्बल १,९२७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असल्याचे दिनांक १६ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे तसेच मराठवाड्यात मागील आठ महिन्यात सततची नापिकी, हवामान बदल, कमी पाउस कर्जबाजारीपणा, शेतमालाला नसलेले भाव यामुळे सुमारे ६८५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची बाब विभागीय आयुक्त यांनी दिनांक १० सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यात कर्ज वसुलीच्या जाचाला कंटाळुन यावर्षी आत्महत्या केलेल्या १४ शेतकऱ्यांपैकी ४ शेतकऱ्यांना व सन २००० पासून आत्महत्या केलेल्या ३३३ शेतकऱ्यांपैकी फक्त १०१ शेतकऱ्यांनाच शासनाकडून आर्थिक मदत मिळाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकरी आत्महत्या रोखण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे, तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूंबियाना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) माहे जानेवारी, २०२३ ते ३१ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत अमरावती विभागात ९५१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले असून, त्यापैकी अमरावती जिल्ह्यात २६८, यवतमाळ, जिल्ह्यात २४६ व बुलढाणा जिल्ह्यात २३७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. तसेच, छत्रपती संभाजीनगर विभागात मागील आठ महिन्यात म्हणजेच मार्च, २०२३ ते ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत ७४१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये सततची नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या कारणांमुळे शेतकऱ्याने आत्महत्या केल्यास मदत व पुनर्वसन विभागामार्फत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत दिली जाते. सोलापूर जिल्ह्यात चालु वर्षी २४ शेतकऱ्यांची आत्महत्या प्रकरणे निदर्शनास आली असून दिनांक २३ जानेवारी, २००६ च्या शासन निर्णयानुसार ४ प्रकरणे शासकीय मदतीस पात्र ठरली व ७ प्रकरणे अपात्र ठरली आहेत. तसेच, १३ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत.

सोलापूर जिल्ह्यात सन २००१ पासून माहे ऑक्टोबर, २०२३ अखेर एकूण ३६९ शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे निदर्शनास आली आहेत. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक २३/०१/२००६ अन्वये १२३ प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरली असून एकूण २३२ प्रकरणे अपात्र ठरली आहेत व ८ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत.

(३) नियमानुसार पात्र ठरलेल्या शेतकरी आत्महत्यांप्रकरणी शेतकऱ्यांच्या वारसांना रुपये एक लक्ष याप्रमाणे मदत देण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरू आहे. शेतकरी आत्महत्या रोखण्याच्यादृष्टीने विविध विभागामार्फत खालील उपाययोजना राबविण्यात येत आहेत :-

१. कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन अंतर्गत शेतकऱ्यांना समुपदेशनाची व प्रबोधनाची आवश्यकता विचारात घेऊन विविध उपाययोजना राबविल्या जातात.

२. विशेष मदतीच्या कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांच्या विकासासाठी "कृषी समृध्दी" योजनेच्या अनुषंगाने विविध विभागांकडून उपाययोजना करण्यात येत आहेत.

३. शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा, शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना मोफत शिक्षणाची योजना यांच्या अंमलबजावणीला गती देणे यासाठी कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन कार्यरत आहे.

४. शेतमालाला हमीभाव, PM-KISAN सारख्या योजनांमार्फत शेतकऱ्यांवरील ताण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना राबविण्यात आली.

५. शेतकऱ्यांना केवळ १.०० रुपये भरून पीक विमा योजनेचा लाभ देण्याकरीता "सर्वसमावेशक पीक विमा योजना" सन २०२३-२४ पासून राबविण्यास दिनांक २३ जून, २०२३ च्या कृषी विभागाच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे.

६. राज्य शासनाकडून प्रतिवर्ष रुपये ६०००/- शेतकऱ्यांना देण्यासाठी नमो किसान शेतकरी महासन्मान निधी योजना कृषी मार्फत राबविण्यात येत आहे.

७. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास राज्य आपत्ती व्यवस्थापन निधीतून अथवा वेळ प्रसंगी राज्य शासनाच्या निधीतून मदत दिली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत ऊसतोडणी यंत्रासाठी अनुदान निधी दिला नसल्याबाबत

**(६) * २२०९४ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊसतोडणी मजूरांची समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून खरेदी करण्यात येणाऱ्या ९०० ऊसतोडणी यंत्रांसाठी (हार्वेस्टर) शासनाच्या महाडीबीटीवर अर्ज मागविण्यात आले असून, त्याकरीता ६,१२८ अर्ज प्राप्त होऊनही सदर अर्जांची लॉटरी पध्दतीने ९०० यंत्राकरीता अंतिम निवड प्रक्रीया प्रलंबित असल्याचे तसेच सदर ऊसतोडणी यंत्रांसाठीचे (हार्वेस्टर) अनुदान केंद्र शासनाकडूनदेखील प्राप्त झाले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील काही कारखान्यांनी सन २०२३ च्या हंगामासाठी हार्वेस्टर घ्यायचे म्हणून ऊस तोडणीसाठी टोळ्यांशी करार केलेला नसून त्यात अद्यापही ऊसतोडणी यंत्रांची (हार्वेस्टर) खरेदी झाली नसल्याने कारखान्यांची ऊस तोडणी यंत्रणा अडचणीत आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील या वर्षीच्या ऊस गळीत हंगामाकरीता ऊसतोडणी यंत्रांची अंतिम निवड प्रक्रीया राबवून, ऊस तोडणीच्या समस्या सोडविण्यासाठी हार्वेस्टरचे अनुदान प्रक्रिया पूर्ण करण्यासंदर्भात तसेच सदर यंत्रांसाठीचा निधी केंद्र शासनाकडून उपलब्ध करुन घेण्याबाबत राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१), (२) व (३) राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत ऊसतोडणी यंत्रांना अनुदान प्रकल्पाअतंर्गत कृषी विभागाच्या महाडीबीटी पोर्टलवर सद्य:स्थितीत वैयक्तिक शेतकरी, उद्योजक, साखर कारखाने यांच्याकडून ७३०० अर्ज प्राप्त झाले आहेत.

सदर प्रकल्पास सन २०२३-२४ करीता रुपये ९६.३९ कोटी इतका अतिरिक्त नियतव्यय मंजूर केल्याचे दिनांक ०३/११/२०२३ च्या पत्राने केंद्र शासनाने कळविले आहे. सदर मंजूर नियतव्ययानूसार प्राप्त होणाऱ्या निधीच्या अधीन राहून ऊस तोडणी यंत्रासाठी प्राप्त झालेल्या अर्जांची राज्यस्तरावर संगणकीय सोडत काढण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर अनुषंगिक बदल करण्याचे काम महाआयटी विभागाकडून सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विविध सहकारी संस्थांच्या नियामक मंडळात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरीता स्वतंत्र तरतूद करण्याबाबत

**(७) * २१८३८ श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतुदीनुसार विविध सहकारी संस्थांच्या नियामक मंडळात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरीता एकत्रित तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील (ओ.टी.एस.पी.) भागात अनुसूचित जमातीची लोकसंख्या कमी असल्याने त्यांना प्रतिनिधित्व करण्याची संधी उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतुदीमध्ये सुधारणा करून विविध सहकारी संस्थांच्या नियामक मंडळात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरीता स्वतंत्र तरतूद करण्यात यावी, अशी मागणी मा.लोकप्रतिनीधीनी माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान जनजाती सल्लागार समितीच्या बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांकडे तसेच मा.सहकार मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) माहे ऑक्टोबर, २०२३ दरम्यान जनजाती सल्लागार समितीच्या बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाद्वारे अनुसूचित जाती व जमाती करीता स्वतंत्र तरतूद करण्याबाबत मागणी करण्यात आली आहे.

(४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३ ब नूसार सहकारी संस्थांच्या संचालक मंडळामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती करीता एका राखीव जागेची तरतूद आहे.

तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील भागातील सहकारी संस्थांमध्ये देखील कलम ७३ ब नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती करीता एकत्रीत एका राखीव जागेची तरतूद आहे. त्यामुळे अनुसूचित जमातीतील इच्छूक उमेदवाराला संचालक मंडळ निवडणूकीस उभे राहण्याची तसेच प्रतिनिधीत्व करण्याची संधी उपलब्ध आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती विभागाअंतर्गत बुलढाणा, अकोला, अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यातील लाखो हेक्टर वन जमिनीची नोंद अभिलेख्यांमधून गहाळ झाल्याबाबत

**(८) * २१९९९ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेश कराड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा, अकोला, अमरावती व यवतमाळ जिल्ह्यातील केंद्र शासनाच्या १९९९ च्या नोंदणी नूसार ६३ लाख हेक्टर वन जमीनीची नोंदणी असताना सन २००१ च्या वार्षिक अहवालात ६१ लाख हेक्टर वनजमीन नोंद असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००१ ते २०२३ या २२ वर्षादरम्यान गहाळ झालेल्या जमिनीचा शोध वन विभागांनी घेतला नाही, तसेच सांख्यिकी अमरावती, यवतमाळ यांनी वार्षिक अहवाल व कार्यक्रम अंदाजपत्रकात दिशाभूल करणारी माहिती दिल्याची तक्रार माजी वन अधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच चौकशीच्या अनुषंगाने सन १९९९ ते २०२३ पर्यंत सर्व अभिलेखाची तपासणी करून गहाळ झालेली वन जमीन पुन्हा मिळविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया, डेहरादून या संस्थेमार्फत प्रकाशित करण्यात आलेल्या State of Forest Report सन १९९९ च्या अहवालात फॉरेस्ट एरिया एकूण ६३,८४२ चौ.कि.मी व

२००१ च्या अहवालात ६१,९३९ चौ.कि.मी. नमूद आहे. तथापि, सदर वनक्षेत्राची आकडेवारी ही केवळ विदर्भातील अमरावती विभागाची नसून संपूर्ण महाराष्ट्र राज्याची आहे. सदर अहवालात विभागानिहाय / जिल्हानिहाय वनक्षेत्राची आकडेवारी दर्शविण्यात आलेली नाही.
(२) सांख्यिकी अमरावती, यवतमाळ यांनी वार्षिक अहवाल व कार्यक्रम अंदाजपत्रकात दिशाभूल करणारी माहिती दिल्याने यांची तक्रार माजी वन अधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे केल्याचे आढळून येत नाही.
(३) व (४) महाराष्ट्र शासनाच्या वार्षिक प्रशासन अहवालानूसार सन १९९९ च्या तुलनेत सन २०२२-२३ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या एकूण वनक्षेत्रात घट झालेली नाही. तसेच अमरावती महसूल विभागांतर्गतच्या अमरावती, अकोला, बुलढाणा व यवतमाळ या जिल्ह्यातील वनक्षेत्रामध्ये सन १९९९ च्या तुलनेत सन २०२२-२३ मध्ये सुमारे १५२.८५८ चौ.कि.मी. ने वाढ झालेली आहे.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील महसूल मंडळांमध्ये सदोष पर्जन्यमापक यंत्रे बसविल्याबाबत

**(९) * २१२५२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील प्रत्येक महसूल मंडळांमध्ये सदोष पर्जन्यमापक यंत्रे असल्यामुळे अतिवृष्टी होऊनसुध्दा चुकीच्या पर्जन्यमान आकडेवारीच्या आधारे पंचनामे केल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असून गंगापूर तालुक्यातील सन २०२२-२३ खरीप पीक विमा हप्ता भरलेल्या १,११,८०५ शेतकऱ्यांपैकी केवळ ५०,६९१ शेतकऱ्यांना पीक विमा मंजूर झाला असून तालुक्यामधील सदोष पर्जन्यमापक यंत्रांच्या चुकीच्या माहितीच्या आधारे केलेल्या बोगस पंचनाम्यांमुळे उर्वरित शेतकऱ्यांना पीक विमा नाकारण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील महसूल मंडळांमध्ये पावसाची प्रत्यक्ष अचूक नोंद होण्याकरीता दोषविरहीत पर्जन्यमापक यंत्रे स्थापित करण्यासाठी तसेच सदोष पर्जन्यमापक यंत्रांवरील चुकीच्या माहितीच्या आधारे पीक विमा नाकारलेल्या शेतकऱ्यांना विम्याची रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.

पंतप्रधान पीक विमा योजनें अंतर्गत सन २०२२-२३ च्या खरीप हंगामामध्ये गंगापूर तालुक्यातील एकूण १,११,९४२ शेतकऱ्यांनी विमा भरला होता, यापैकी ७१,५५६ शेतकऱ्यांना रुपये ५५.१३ कोटी एवढी नुकसान भरपाई विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वर्धा वनपरिक्षेत्रांतर्गत पांढरकवडा, गणेशपूर व साटोळा येथे वृक्ष लागवडीची बोगस देयके मजुरांच्या नावे काढल्याबाबत

**(१०) * २१५८२ श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा वनपरिक्षेत्रांतर्गत पांढरकवडा, गणेशपूर व साटोळा येथे वृक्ष लागवड करताना मशीनद्वारे खड्डे करून मजुरांच्या नावे देयक काढण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून त्याअनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

वर्धा वन विभाग (प्रा), अंतर्गत वर्धा वनपरिक्षेत्रातील मौजा गणेशपुर व साटोळा येथे सन २०२२-२३ या वर्षात राज्य योजनेंतर्गत वृक्ष लागवडीची कामे करण्यात आली आहेत. सदर वृक्षलावगड करताना मशीनद्वारे खड्डे करण्यात आले नसून मजुरांकडून खड्डे करण्यात आलेले आहेत. तसेच सामाजिक वनीकरण विभागांतर्गत सदर क्षेत्रावर सन २०२३ मध्ये वृक्षलावड करण्यात आलेली नाही.

गणेशपूर व साटोळा येथे करण्यात आलेल्या वृक्षलावडीसाठी मशीनव्दारे खड्डे करून मजुरांच्या नावे देयक काढण्यात आल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संयुक्त आदिवासी कृती समितीच्या विविध मागण्यांबाबत

**(११) * २१५५७ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासींचे आरक्षण, बोगस आदिवासींनी अनुसूचीत जमातीच्या राखीव संवर्गातून मिळविलेली नियुक्ती, पदोन्नती व त्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचा निर्णय, पदभरती, गोंडवाना संग्रहालयाचे स्थानांतरण व आदिवासींच्या अन्य विविध समस्यांबाबत व मागण्यांबाबत संयुक्त आदिवासी कृती समितीने नागपूर येथे दिनांक २७ ऑक्टोबर,२०२३ रोजीपासून धरणे आंदोलन करून आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संयुक्त आदिवासी कृती समितीच्या निवेदनातील ११ मागण्यांसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) निवेदनातील धनगर समाजाच्या संदर्भातील टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचा अहवाल, गोंडवाना संग्रहालय, भारतीय प्रशाासकीय सेवेच्या परिक्षेसाठीच्या प्रशिक्षणांर्थींची संख्या २०० करणे या व विभागाशी संबंधित इतर मुद्यांबाबत कार्यवाही सुरु आहे.

मंत्रिमंडळाने दिनांक १४/१२/२०१९ च्या बैठकीत घेतेलेल्या निर्णयानुसार अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे सेवामुक्त केलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर नियुक्ती देण्याचे आदेश दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत. अनुसूचित जमातीची रिक्त झालेली पदे कालबध्द कार्यक्रम आखून विशेष भरती मोहिम राबवून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अखत्यारीतील पदे दिनांक ३१/१२/२०२३ पर्यंत व गट-क व गट-ड मधील पदे दिनांक ३१/०७/२०२३ पर्यंत भरण्याचे आदेश दिनांक १४/१२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत.

तसेच इतर विभागांच्या संबंधित मुद्यांबाबत निवेदन संबंधित विभागांकडे पाठविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोदवड (जि.जळगाव) तालुक्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई मिळणेबाबत

**(१२) * २१८५६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोदवड तालुक्यामध्ये (जि.जळगाव) दिनांक ६ ऑक्टोबर २०२१ तसेच ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर, २०२२ व एप्रिल, जून, सप्टेबर २०२३ मध्ये झालेल्या अतिवृष्टी, ढगफुटी, वादळी वारा यामुळे शेतीपिकांसह घरांची पडझड झाली असून पंचनामे होवूनही अद्याप नुकसान भरपाई मिळाली नसल्याबाबतची तक्रार श्री.आबा पाटील रा.मानमोडी, ता.बोदवड यांनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी तहसिलदार, बोदवड यांचेकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच चौकशीच्या अनुषंगाने बोदवड, (जि.जळगाव) तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसानीची भरपाई देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) होय.

(२) जळगाव जिल्ह्यातील सन २०२१ ते सन २०२२ या कालावधीतील नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या मालमत्तेच्या नुकसानीकरीता विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडून प्राप्त झालेल्या रुपये १६५०.३० लक्ष प्रलंबित प्रस्तावांची छानणी पूर्ण झाली असून लवकरच निधी वितरण्यास मान्यता देण्यात येईल. तसेच, जळगाव जिल्ह्यात जून-जुलै २०२३, या कालावधीतील नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरीता शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक ३०/११/२०२३ अन्वये रुपये ५९४.७७ लक्ष निधी वितरणास मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील आदिवासी नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढल्याबाबत

**(१३) * २१५९२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारत जोडो अभियान व शोषित जन आंदोलन यात्रेअंतर्गत विविध प्रश्न सोडविण्यासाठी रायगड जिल्ह्यातील आदिवासी दलित शेतमजुर, शेतकरी व सामान्य नागरिकांनी दिनांक १२ सप्टेंबर, २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेऊन लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनामध्ये आदिवासींच्या विकासासाठी प्राप्त होणारा निधी न वापरता परत जात असल्याने आदिवासींना योजनांचा लाभ मिळत नसल्याने सदर निधी योग्य प्रकारे वापरण्यात यावा, आदिवासींना आरोग्य सेवेचा लाभ मिळावा, जिल्ह्यातील ठाकूर आदिवासी समाजाला शिक्षणासाठी जातीचे दाखले मिळण्याकरीता योग्य उपाययोजना कराव्यात आदी मागण्यांचा सदरहू निवेदनात समावेश करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त मागण्यांसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) भारत जोडो अभियान व शोषित जन आंदोलन यात्रेअंतर्गत देण्यात आलेल्या निवेदनामध्ये विविध विभागांशी संबंधित मुद्यांचा समावेश आहे. अपर जिल्हादंडाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांच्या दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर निवेदनाच्या अनुषंगाने उचित कार्यवाहीकरीता (१) मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग (२) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण (३) सहायक आयुक्त, समाज कल्याण रायगड-अलिबाग यांना कळविले आहे. तसेच सदर निवेदनातील जिल्हाधिकारी कार्यालयाशी संबंधित मुद्यांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांचे स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यात स्वंयचलित हवामान केंद्र उभारण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(१४) * २१९२१ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना हवामानाची अचूक माहिती मिळावी, नुकसान भरपाई, पिकविमा योजनेचा लाभ देणे सुलभ व्हावे यासाठी रत्नागिरी जिल्ह्यात ग्रामपंचायत स्तरावर ३०० स्वंयचलित हवामान केंद्रे उभारण्याचा प्रस्ताव माहे डिसेंबर, २०२२ मध्ये कृषी विभाग, (जि.रत्नागिरी) यांनी शासनास सादर केला असल्याचे तसेच स्थानिक कृषी विभागाने त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठवून ७ महिने इतका कालावधी होऊनही कार्यवाही झाली नसल्याचे दिनांक १० ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्वयंचलित केंद्रावरुन पर्जन्यमान, तापमान, सापेक्षा अर्हता, वाऱ्याची दिशा व वेग इत्यादी नोंद घेतली जाऊन त्या नोंदणीनुसार हवामानातील बदलामुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना नुकसान भरपाई तसेच पीक विमा योजनेचा लाभ देणे सुलभ होईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्वंयचलित हवामान केंद्रे उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) केंद्र सरकारच्या WINDS प्रकल्पांतर्गत ग्रामपंचायत स्तरावर पर्जन्यमापक बसविण्यासाठी यंत्रणांची तांत्रिक गुणवत्तेच्या आधारे निश्चिती करणेत आलेली आहे. त्यानुषंगाने WINDS (Weather Information Network Data System) प्रकल्पाच्या अंमलबजावणी करणे करीता यंत्रणांची निवड करणेसाठी निविदा मसूदा अंतिम करणेची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तहसिलदार पदासाठी कंत्राटी पध्दतीने भरती करण्याची जाहिरात प्रसिध्द केल्याबाबत

**(१५)** * **२२०५९ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तहसिलदार पदासाठी कंत्राटी पध्दतीने भरती करण्याची जाहिरात प्रसिध्द करून अर्ज मागविण्यात आल्याची घटना माहे सप्टेंबर २०२३ च्या अखेरीस उघडकीस आली आहे हे खरे आहे का,
(२) असल्यास सरकारी कार्यालयात काम करण्यासाठी कंत्राटी पध्दतीने कर्मचारी नियुक्तीचा निर्णय शासनाने घेतल्यामुळे सदर पदभरतीत आरक्षणाची अंमलबजावणी होणार नसल्यामुळे मागास प्रवर्गातील उमेदवारांवर अन्याय होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे का,
(३) असल्यास, कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांमुळे शासकीय कामकाजातील गोपनीयता भंग होण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तविली आहे, हे ही खरे आहे का,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच चौकशीच्या अनुषंगाने महत्त्वाची पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

नवनियुक्त तहसिलदार पदाची भरती करण्याबाबतची जाहिरात जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांच्याकडून प्रसिध्द करण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन अधिसूचना क्र. LQN-१२/२०१३/C.R.१९०/A-२, दिनांक १९/०३/२०१४ अन्वये भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ नूसार सेवानिवृत्त तहसिलदार संवर्गातील अधिकारी यांच्या सेवा मानधन तत्वावर उपलब्ध करुन घेणेकामी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

शासनाने मंजूर केलेल्या व शासनास पदभरती करण्याचे अधिकार असलेल्या कोणत्याही पदावर पदभरती करण्याबाबतची जाहिरात जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांच्याकडून प्रसिध्द करण्यात आलेली नाही.

(३) अशी बाब उद्वभवलेली नसल्याने हे खरे नाही.

(४) शासनाने मंजूर केलेल्या पदावर जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांच्यामार्फत कोणतीही पदभरतीची जाहिरात प्रसिध्द करण्यात न आल्याने चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील सोयाबीन प्रक्रिया उद्योगाला चालना देण्याबाबत

**(१६) * २१३३३ श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशामध्ये उत्पादीत होणाऱ्या एकूण सोयाबीन उत्पादनांपैकी २७ टक्के सोयाबीनचे उत्पादन महाराष्ट्रामध्ये घेतले जात असून, त्यात २० टक्के पेक्षा अधिक उत्पादनामध्ये घट झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोयाबीनच्या पिकाचे कमी उत्पादन, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमधील सोयाबीनच्या दरातील चढ-उतार आणि शासकीय धोरणावरील अवलंबित्व यामुळे विदर्भातील सोयाबीन प्रक्रिया उद्योग अडचणीत येऊन ८० टक्के उद्योग बंद पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भात सोयाबीन प्रक्रिया उद्योगांची संख्या ३० च्या वर तसेच त्याची गाळप क्षमता ३५ ते ४० लाख टन होती, त्यामध्ये घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विदर्भातील सोयाबीन प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यासाठी तसेच सोयाबीनच्या उत्पादनामध्ये वाढ होण्यासाठी शासनामार्फत चौकशी करुन कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे, सन २०२३-२४ मध्ये राज्यात सोयाबीन पिकाखाली ५०.५४ लाख हे क्षेत्र असून त्यामध्ये सरासरी पेक्षा (४१.५० लाख हे.) २२% वाढ झाली आहे. तथापि, अपुऱ्या पर्जन्यमानामुळे पूर्वानुमानानुसार उत्पादनात ६% घट दिसून येत आहे.

(२) व (३) विदर्भातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर, अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यात एकूण ४० सोयबीन प्रक्रिया उद्योग आहेत. त्यापैकी, ३१ उद्योग सुरू असून ९ उद्योग (१९ टक्के) खेळत्या भांडवलाची कमतरता, बाजारपेठेतील चढाओढ इत्यादी कारणाने बंद आहेत. सोयाबीन प्रक्रिया उद्योगांची गाळप क्षमता मागणीप्रमाणे कमी जास्त होते.

(४) सोयाबीन पिकाच्या उत्पादनामध्ये, लागवडी खालील क्षेत्रात वाढ करण्यासाठी आणि मुल्य साखळी विकसित करण्याच्या हेतूने केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय खाद्य तेल अभियान (NMEO) व राज्य पुरस्कृत सोयाबीन आणि इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास विशेष कृती इ. योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांतर्गत नवीन तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्यक्षिकांचे आयोजन, रुंद सरी वरंबा (बिबीएफ) तंत्रज्ञानाचा वापर, गुणवत्तापूर्ण निविष्ठांचा पुरवठा, साठवणूक सुविधा, यांत्रिकीकरण व सिंचन साधने इ. उपक्रमांची अंमलबजावणी केली जात आहे.

विदर्भातील सोयाबीन प्रक्रिया उद्योगांना चालना देण्याच्या अनुषंगाने उद्योग विभागाकडून सोयाबीन आधारित प्रकल्पांना सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत ८० टक्के ते १०० टक्के पर्यंत अनुदान देण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पूर्णा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील नामांकित शाळेत विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध नसल्याबाबत

**(१७) * २१४३१ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्णा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत १०० विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश देण्यात आला असून, सदर शाळेमध्ये प्रत्यक्षात सोयीसुविधांचा अभाव असतानाही शाळेची प्रत्यक्ष पाहणी न करताच विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा मिळत असल्याचा बोगस अहवाल येथील आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाने तयार केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यातील अनेक पालकांनी पाल्यांना नामांकित इंग्रजी शाळेमधून कुठल्याही शैक्षणिक व भौतिक सुविधा मिळत नसल्याची तक्रार आदिवासी प्रकल्प कार्यालयाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळेची माहिती घेऊन विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यासह बोगस अहवाल सादर करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सन २०२२-२३ मध्ये सोयी-सुविधांबाबत पालकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत प्रकल्प कार्यालयाकडून तपासणी करण्यात आली व तपासणीअंती आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत संबंधित मुख्याध्यापकांना सूचना देण्यात आल्या आहेत. तद्नंतर सन २०२३-२४ च्या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थी वाटपासंबंधात हायटेक इंग्लिश स्कूल, एरंडेश्वर, ता.पूर्णा, जि.परभणी या शाळेची तपासणी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला व तद् नंतर आयुक्त आदिवासी विकास, नाशिक यांच्याकडून गठीत करण्यात आलेल्या समितीकडून पुनर्तपासणी करण्यात आली आहे. तपासणीअंती ठरवून दिलेल्या निकषानुसार प्राप्त झालेल्या गुणांकणानुसार शाळेची मान्यता कायम ठेवून सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरीता इयत्ता १ ली व २ री साठी ५० विद्यार्थ्यांचे वाटप करण्यात आलेले आहे. तसेच विद्यार्थी समायोजनाच्या धोरणानुसार ५५ विद्यार्थ्यांचे वाटप सदर शाळेस करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यामध्ये वाळू उपसा करण्याचा करार संपुष्टात आल्यानंतरही वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१८) * २१५४० श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरमध्ये रेतीचा पुरवठा होत असलेल्या बोढेगाव घाटातून वाळू उपसा करण्याचा करार माहे जून, २०२३ मध्ये संपुष्टात आला असताना माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये रेती उपसा झाल्याचे तसेच विक्रीची मुदत संपल्यावरही विक्री सुरू असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन करार संपल्यानंतर रेती उपसा व शासनाचा महसूल बुडवून जास्त दराने रेती विक्री करणाऱ्यांवर कोणती दंडात्मक कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२)व (३) हे खरे नाही.

नागपूर जिल्ह्यात एकूण ४० वाळू घाट असून त्यापैकी २ वाळू घाट शासकीय कामासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. उर्वरीत ३८ रेतीघाटांचे ११ वाळू डेपो तयार करण्यात आले आहेत. बोढेगाव या नावाचा कुठलाही रेतीघाट नागपूर जिल्ह्यात नाही.

नागपूर जिल्ह्यात अवैध वाळू गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी माहे ३०/०६/२०२२ ते १५/१०/२०२३ या कालावधीत एकूण २९४ वाहनांवर कारवाई करुन ४४२.०२ लाख इतका दंड आकारुन १७ प्रकरणी गुन्हे दाखल केलेले आहेत.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१९) * २२१२६ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत कृषी विभागातील कृषी उपसंचालक, तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी इत्यादी ४१७ रिक्त पदांसाठी माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये परीक्षा घेण्यात आली असून, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मनमानी कारभारामुळे सदरहू पदांवर अद्याप नियुक्त्या करण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने गत ४० वर्षानंतर परीक्षा पध्दतीत बदल करुन सदरहू परिक्षेकरीता आलेल्या आक्षेपानंतरही परीक्षा पध्दती राबविण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने रिक्त असलेल्या ४१७ पदे भरण्यासंदर्भात तसेच सदरहू परिक्षेकरीता आलेल्या आक्षेपानंतरही परीक्षा पध्दती राबविण्यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नियुक्त्या लवकरात लवकर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र कृषी सेवा (मुख्य) परीक्षा, २०२१ करीता कृषी उपसंचालक, गट अ, तालुका कृषी अधिकारी, गट ब, मंडळ कृषी अधिकारी, गट ब (कनिष्ठ) या संवर्गाकरीता एकूण २०३ पदांकरीता १ ऑक्टोबर, २०२२ रोजी परीक्षा घेण्यात आली. सदर परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केल्यानुसार कृषी उपसंचालक, गट-अ संवर्गातील उमेदवारांचे महसूल विभाग वाटप करण्यात आले असून, त्यांना वाटप करण्यात आलेल्या महसूल विभागात पदस्थापने देण्याच्या अनुषंगाने नागरी सेवा मंडळाची बैठक आयोजित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केल्यानूसार तालुका कृषी अधिकारी, गट-ब आणि कृषी अधिकारी गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील उमेदवारांना महसूल विभाग वाटप करुन, त्यांना वाटप करण्यात आलेल्या महसूल विभागात पदस्थापना देण्याच्या अनुषंगाने नागरी सेवा मंडळाची बैठक आयोजित करुन नियमोचित प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत आयुक्त (कृषी) यांना कळविण्यात आले आहे.

महाराष्ट्र कृषी सेवा (मुख्य) परीक्षा, २०२२ करीता कृषी उपसंचालक, गट अ, तालुका कृषी अधिकारी, गट ब, मंडळ कृषी अधिकारी, गट ब (कनिष्ठ) या संवर्गाकरीता एकूण २१४ पदांकरीता दिनांक १३/०५/२०२३ रोजी परीक्षा घेण्यात आली असून, अद्यापि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवारांच्या शिफारशी प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

कृषी व कृषी अभीयांत्रिकी या अभ्यास क्रमांबरोबरच इतर कृषी विषयक विषयांचा समावेश परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये करण्याबाबत उमेदवारांकडून आयोगास अभिवेदने प्राप्त झाली होती. या संदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत त्रिसदस्यीय अभ्यासक्रम समिती नियुक्त करण्यात आली होती.

सदर अभ्यासक्रम समितीने तयार केलेल्या अभ्यासक्रमानूसार सन २०२३ परीक्षांपासून वर्णनात्मक स्वरूपाची परीक्षा घेण्याचा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने निर्णय घेतला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुलुंड (जि.मुंबई) व मीरा रोड (जि.ठाणे) येथे मराठी माणसांना कार्यालयासाठी जागा देण्याचे नाकारण्यात आल्याबाबत

**(२०)** * **२१९६२ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड (जि.मुंबई) येथे कार्यालयासाठी जागा शोधण्यास गेलेल्या मराठी महिलेला जागा देण्यास विकासकाने नकार दिला असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मीरा रोड (जि.ठाणे) येथे नव्या संकुलात मराठी माणसाला घर नाकारण्यात आले असून प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत अमराठींना प्राधान्य असे नमूद केले असल्याचेही माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशीच्या अनुषंगाने मुलुंड येथे मराठी माणसास घरे नाकारणाऱ्या संबंधित विकासकाविरुध्द तसेच मीरा रोड येथील नव्या संकुलात मराठी माणसांकरीता घरे नाकारुन अमराठींना प्राधान्य अशी जाहिरात देणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

दिनांक २७/०८/२०२३ रोजी श्री. व सौ. तृप्ती देवरुखकर या आपल्या व्यवसायाकरीता जागा पाहण्यासाठी मुलुंड (प.) येथील शिवसदन को.ऑप.हौ.सो.लि. या संस्थेत गेल्या असता संस्थेतील पदाधिकाऱ्यांनी देवरुखकर परिवारास दिलेल्या चुकीच्या वागणूकीवर कारवाई करणेबाबत व भविष्यात अशा घटना होऊ नये म्हणून उपाय योजना करणे बाबत मा.श्री.मनोज कोटक, खासदार लोकसभा व मा.श्री.मिहिर कोटेचा, वि.स.स. यांनी दिनांक २८/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये उपनिबंधक, सहकारी संस्था, टि-विभाग, मुंबई या कार्यालयाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे.

(३) मा.श्री.मनोज कोटक, खासदार लोकसभा, व मा.मिहिर कोटेचा, यांनी दिनांक २८/०९/२०२३ रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने उपनिबंधक, सहकारी संस्था, टि-विभाग, मुंबई यांच्या कार्यकक्षेतील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांना दिनांक ०३/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये भाषा, जन्माचे ठिकाण यावरुन भेदभाव करुन सहकारी गृहनिर्माण संस्थेतील जागा नाकारणे अशा घटना निदर्शनास आल्यास त्या बाबतची जबाबदारी व्यवस्थापक समितीची असेल, त्यामुळे सर्व गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या व्यवस्थापक समितीनी आपआपल्या संस्थांमध्ये याबाबत जागरुकता निर्माण करावी. भविष्यात उपरोक्त मुद्यावरुन भेदभाव, वाद इ. घटना होऊ नये या करीता संस्थेचे पदाधिकारी समिती व सभासद यांनी दक्षता घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील जूवे (जैतापूर) बेट ते देवाचे गोठणे (राघव वाडी) हा रस्ता पूर्ववत सुरु करण्याबाबत

**(२१) * २२३१२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जैतापूर खाडी (अर्जुना नदी)(ता.राजापूर, जि.रत्नागिरी) च्या मध्यभागी ४५ हेक्टर क्षेत्रात १११ घरांची वस्ती असलेले व चारही बाजूंनी खाऱ्या पाण्याने वेढलेल्या जूवे बेटावरील ग्रामस्थांना नैसर्गिक आपत्ती, वैद्यकिय उपचार तसेच जीवनावश्यक सोयी-सुविधांकरीता जैतापूर बाजार पेठ येथे जाण्या-येण्यासाठी पूर्णत: होडीच्या प्रवासावर अवलंबून रहावे लागत असल्याने अनेकदा नागरीक व विद्यार्थ्यांचे पाण्यात बुडून मृत्यू झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००९ मध्ये खारभूमी विकास मंडळ, उपविभाग लांजा यांचे अंतर्गत जूवे (जैतापूर) बेट ते देवाचे गोठणे (राघव वाडी) या ९०० मीटर लांबीचा बंधारा बांधण्यात येवून याचा वाहतूकीसाठी वापर करण्यात येत होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०११ पासून देवाचे गोठणे (राघव वाडी) हद्दीतून जाणारा सदर रस्ता वैयक्तिक मालकी हक्काच्या जागेत येत असल्याने या जागेच्या मालकाने चिरेबंदी कंपाऊंड घालून जूवे बंधाऱ्यापर्यंत येणारा रस्ता वाहतुकीसाठी बंद केल्याने ग्रामस्थांना पुन्हा जीव धोक्यात घालून होडीनेच प्रवास करावा लागत असल्याबाबत मा.वने मंत्री यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने मा.मंत्री यांनी दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ रोजी प्रधान सचिव, वने यांना यासंबंधित बैठक आयोजित करण्याबाबत कळविले असतानाही तसेच ग्रामस्थांनीही संबंधित विभागाकडे पाठपुरावा करुनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जूवे येथील ग्रामस्थांची गैरसोय टाळण्याच्यादृष्टीने जूवे (जैतापूर) बेट ते देवाचे गोठणे (राघव वाडी) हा रस्ता पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

जुवे बेटावरील ग्रामस्थांना नैसर्गिक आपत्ती, वैद्यकीय उपचार तसेच जीवनावश्यक सोयी-सुविधांकरीता जैतापूर बाजार पेठ येथे जाण्या-येण्यासाठी होडीचा मार्ग तसेच जुवे बेट ते दवाचे गोठणे दरम्यान पर्यायी पायवाट उपलब्ध आहे. तथापि, सदर प्रवासादरम्यान नागरिक व विद्यार्थ्यांचे पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची झाल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

भात शेतीचे संरक्षण करण्यासाठी जुवे (जैतापूर) बेट ते देवाचे गोठणे (राघव वाडी) दरम्यान खारभूमी विभागामार्फत ९०० मी लांबीचा बंधारा बांधण्यात आला आहे. तथापि, सदर बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूला खाजगी जमीन असल्याने पायवाट स्वरुपाच्या वाहतुकीसाठी याचा उपयोग सुरु होता. तद्नंतर सन २०११ मध्ये खाजगी जागेच्या मालकाने चिरेबंदी कंपाऊंड घालून बंधाऱ्यापर्यंत जाणारा रस्ता वाहतुकीसाठी बंद केला आहे.

प्रस्तुत बंधाऱ्याच्या दुतर्फा कांदळवन प्रजातीची झाडे दिसून येत असल्यामुळे सदर प्रस्तावित बांधकामासाठी CRZ ची परवानगी, वन संवर्धन अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाची व मा.उच्च न्यायालयाची परवानगी आवश्यक असल्याचे वन परिक्षेत्र अधिकारी, रत्नागिरी यांनी दिनांक १३/१०/२०२२ च्या पत्रान्वये विभागीय अधिकारी, खारभूमी विकास उप विभाग, लांजा यांना कळविले आहे. त्याबाबतचा कोणताही प्रस्ताव प्रकल्प यंत्रणेने सादर केलेला नाही.

(४) व (५) सदर रस्त्याची पाहणी जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग, राजापूर यांच्यामार्फत करण्यात आली असून देवाचे गोठणे (राघववाडी) ते जूवे (जैतापूर) बेट अंतर्गत रस्त्यापर्यंतचा रस्ता तयार करण्यासाठी व बंधाऱ्याच्या दोन्ही बाजुंची खाजगी जमीन भूसंपादित करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्याव्दारे तयार करण्यात येत आहे.

-----------------

## मौजे डाकीवली (ता.वाडा, जि.पालघर) येथील बेकायदेशीर दगडखाण क्रशर मशीनच्या व्यवसायाबाबत

**(२२) * २२३६७ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डाकीवली (ता.वाडा, जि.पालघर) येथे मे.युनिव्हर्सल इंटरप्रायजेस या कंपनीने बेकायदेशीर व नियमबाह्य पध्दतीने दगडखाण क्रशर मशीनचा व्यवसाय सुरु केला असून रात्रीच्या वेळी दगड गौण खनिज उत्खनन व ब्लास्टिंगमुळे आदिवासी पाड्यातील घरांना तडे जाऊन घरांचे नुकसान झाल्याचे तसेच नळाद्वारे येणाऱ्या पाण्यात खाणीची धूळ मिसळून धुळमिश्रित पाणी नागरिकांना प्यावे लागत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे दिनांक १९ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बेकायदेशीर व नियमबाह्य दगड गौण खनिज उत्खननावर बंदी घालण्याबाबत ग्रामपंचायतीने ठराव करून वाडा तालुक्यातील स्थानिक ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी पालघर, यांचेकडे तक्रार माहे ऑगस्ट, २०२३ वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) मे.युनिव्हर्सल इंटरप्रायजेस यांना मौजे डाकीवली (ता.वाडा, जि.पालघर) येथील ग.नं.९७, ९८ व १३६ मधील ०४.४६ हे.आर क्षेत्रासाठी महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनीयमन) नियम, २०१३ मधील तरतुदीनूसार पाच वर्षाच्या कालावधी करीता खाणपट्टा मंजूर केला आहे. तसेच सदर कंपनीस Controller of Explosive for Joint Chief Controller of Explosive, West Circle, Mumbai यांच्याकडून ब्लास्टींग परवानगी प्राप्त झालेली आहे. तर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे यांच्याकडून क्रशर मशीन बसविण्यास दिनांक ०१/०५/२०२१ अन्वये परवानगी दिलेली आहे.

ग्रामविकास अधिकारी, डाकीवली यांच्या अहवालानुसार मौजे डाकीवली येथील नळ पाणीपुरवठा योजनेमार्फत पुरविले जाणारे पाणी दूषित असल्याचे आढळून आलेले नाही.

मौजे डाकीवली ग्रामपंचायत हद्दीतील दगडखाणी/खाणीमधील ब्लास्टींगमुळे घरांच्या भिंतीना तडे जावून होत असलेल्या नुकसानीबाबत संबंधित दगडखाण/क्रशर संदर्भात कायदेशीर कारवाई करणेसंदर्भात जिल्हाधिकारी, पालघर यांना प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, वाडा यांनी केलेल्या चौकशी तक्रारीमध्ये तथ्य आढळून आलेले नसल्याने सदर तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

-----------------

## राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत बनावट जॉब कार्डद्वारे कोट्यवधी रुपयांचा गैरव्यहार करण्यात आल्याबाबत

**(२३) * २२६१६ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी (मनरेगा) योजनेंतर्गत बनावट जॉब कार्ड काढून शासनाची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचे दिनांक २१ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने जॉब कार्ड, आधार कार्ड आणि त्यांच्या बँक खात्यांशी जोडणी करण्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीत राज्यात १ लाख पेक्षा अधिक बनावट जॉब कार्डस आढळून आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गैरव्यवहारात सहभागी असलेल्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) बनावट जॉबकार्ड काढून शासनाची फसवणूक झाल्याची बाब निदर्शनास आली नाही. तथापि, केंद्र शासनाच्या निर्देशानुसार जॉबकार्ड पडताळणी दरम्यान मयत व पत्ता बदलण्यामुळे किंवा गाव बदलल्यामुळे इत्यादी कारणांनी काही जॉबकार्ड रद्द करण्यात आली आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## न्याहाडी (जि.पालघर) येथील आदिवासी विकास मंडळाच्या केंद्रांवर भात खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२४) * २२६५० श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्याहाडी (जि.पालघर) येथील आदिवासी विकास मंडळाच्या केंद्रांवर सन २०२२–२३ या वर्षात भात खरेदी घोटाळा झाला असून खरेदी करण्यात आलेल्या सुमारे २० हजार ३०० क्विंटल धान्य गोदामात नसल्याचे दिनांक ४ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी भात खरेदीत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे जबाबदार गोदामपाल, विपणन निरीक्षक, उप प्रादेशिक व्यवस्थापक व प्रादेशिक व्यवस्थापक तसेच संस्था सचिव व संस्था अध्यक्ष यांचेवर स्थानिक पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करणेकरीता महामंडळाने दिनांक ०१/१२/२०२३ अन्वये प्रादेशिक व्यवस्थापक, जव्हार यांना निर्देश देण्यात आले आहेत. तसेच महामंडळाचे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर विभागीय चौकशी करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) प्रकल्पांतर्गत अवजारे यंत्र तसेच मालवाहतूक वाहने वाटपात अनियमितता झाल्याबाबत

**(२५) * २१५०३ श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) प्रकल्पांतर्गत मागील काळात वाटप झालेल्या अवजारे बँक, तसेच मालवाहतूक वाहने यामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्यासंदर्भात तेथील शेतकरी, कंपन्या व संबंधित गटाकडून शासनास करण्यात आलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने बुलढाणा जिल्ह्यातील कृषी अधिकाऱ्यांच्या वेगवेगळया पथकांनी एकाच वेळी भेटी देऊन शेतकरी गट व कंपन्यांकडून अवजारे यंत्राबाबत चौकशी करुन त्याबाबतच्या अहवाल शासनास सादर केला असल्याचे दिनांक ११ ऑगस्ट,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार केलेल्या तपासणीत सदर पथकांना बँकांचे बरेच साहित्य व अवजारे आढळून आले नसून या साहित्यांची किंमत तब्बल ३ कोटी ६३ लाख असल्याचे तसेच पुरवठादारांकडून अवजारे न घेताच त्याची देयके सादर करण्यात आल्याचे अहवालात नमूद केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) होय, विभागीय कृषी सह संचालक, अमरावती यांनी दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प यांना अकोला जिल्ह्यातील कृषी अवजार बँक घटकांचा तपासणी अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे.
(२) व (३) अकोला जिल्ह्यामध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत आज अखेरपर्यंत एकूण २०७ कृषी औजारे बँकांना एकूण रुपये १९,४९,६०,०३३/- इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे. ११५ शेतकरी गट/ कंपन्यांकडे औजारे कमी आढळून आल्याने वसुलीच्या नोटीसा बजावल्या होत्या. त्यापैकी ९१ शेतकरी गट/ कंपन्यांकडून अवजारे सुस्थितीत असल्याबाबत खुलासे प्राप्त झाले आहेत. सदर प्राप्त खुलाश्यांच्या अनुषंगाने औजारे बँकांची क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांच्यामार्फत पुनर्तपासणी केली असता २४ शेतकरी गट/कंपनी यांच्याकडे औजारे कमी आढळून आली असून त्यापैकी ३ शेतकरी गट/ कंपन्यांनी यांच्याकडे एकही औजारे उपलब्ध नसल्याचे दिसून आले आहे. शेतकरी गट/कंपनी यांच्याकडे

एकूण रुपये ४७,०८,८००/- रकमेची औजारे आढळून आलेली नाहीत. त्यामुळे शेतकरी गट/कंपनी यांना वरील अनुदान रक्कम वसुलीची अंतिम नोटीस बजावण्यात येत आहे. तसेच अकोला जिल्ह्यातील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथील आदर्श नागरी पतसंस्थेत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२६) * २१६९१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) छत्रपती संभाजीनगर येथील आदर्श नागरी पतसंस्थेत २०२ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पतसंस्थेच्या सन २०१० पासून करण्यात आलेल्या प्रत्येक लेखापरिक्षण अहवालामध्ये सदरहू अनियमितते प्रकरणी दोषी असलेल्या व्यक्तींची नावे नमूद करण्यात आली असूनही, त्यांचेवर कारवाई करण्याकडे उपनिबंधक कार्यालयाने जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याचेही माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने छत्रपती संभाजीनगर येथील आदर्श नागरी पतसंस्थेतील गैरव्यवहार प्रकरणी दोषींवर कारवाई करुन या सर्व प्रकरणाकडे जाणिवपुर्वक दुर्लक्ष करणाऱ्या उपनिबंधक कार्यालयातील दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवरदेखील कारवाई करुन सदरहू पतसंस्थेतील ठेवीदारांची रक्कम वसूल करुन देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) खरे आहे.
(२) आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या सन २०१५-१६ पासूनच्या लेखापरिक्षण अहवालामध्ये कर्ज प्रकरणांतील अनियमिततेबाबत दोषी असलेल्या व्यक्तींची नावे नमूद करण्यात आलेली आहे. परंतु त्याबाबत संबंधित लेखापरिक्षकाने विशेष अहवाल सादर न केल्यामुळे संबंधित व्यक्तींवर कारवाई करण्यात आली नाही.

तथापि, सदर पतसंस्थेचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या दिनांक ०७/१२/२०१९ रोजीच्या आदेशान्वये सन २०१६ ते २०१९ या कालावधीचे तसेच दिनांक २८/०२/२०२२ अन्वये सन २०१८ ते २०२२ या कालावधीचे चाचणी लेखापरिक्षण करण्यात आले आहे.
(३) सदर चाचणी लेखापरीक्षणच्या आधारे सिडको पोलीस स्टेशन, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दाखल करण्यात आलेल्या फिर्यादिच्या आधारे ५५ आरोपींवर रुपये ९९,०७,९०,५७९/- व ५१ आरोपींवर रुपये १०३,१६,७३,३८१/- रकमेच्या अपहार, गैरव्यवहार, फसवणूक, बनावटीगीरी, कट कारस्थान याबाबत गुन्हा क्र. ४५५ दिनांक ११/०७/२०२३ रोजी दाखल केला आहे. सदर प्रकरणी तत्कालीन जिल्हा उपनिबंधक श्री.सतीश खरे यांना अटक करण्यात आली असून त्यांना जामीन मिळाला आहे. सदर प्रकरणातील दोषी व्यक्तींवर पोलीस यंत्रणेमार्फत कारवाई सुरु आहे.

पतसंस्थेतील ठेवीदारांची रक्कम वसूल करुन देण्याच्यादृष्टीने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७८(अ) अन्वये तीन शासकीय अधिकाऱ्यांची प्रशासकीय समिती दिनांक ०२/०८/२०२३ रोजी नियुक्त केली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये दोषी संचालकांवर व संबंधितांवर ०७ मुद्यांच्या अनुषंगाने रुपये १८०,४८,७७,४८५/- जबाबदारी निश्चित करण्यासाठी श्री.डी.आर. मातेरे, सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता.सिल्लोड-सोयगांव यांची दिनांक १०/०७/२०२३ रोजीच्या आदेशान्वये प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

संस्थेच्या १५ मालमत्तांची विक्री करण्यास जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाने प्रशासकीय समितीस मान्यता दिली आहे. कर्ज वसूलीची प्रकिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पशुधनाचे लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लसीकरण पूर्ण करण्याबाबत

**(२७) * २२२४१ श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अरुण लाड : तारांकित प्रश्न क्रमांक १९७३५ ला दिनांक २१ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १ कोटी ३९ लाख जनावरांना लम्पी या चर्मरोगांचा आजार झाल्यामुळे या आजाराला प्रतिबंध करण्यासाठी १ कोटी २५ लाख पशुधनाचे लसीकरण झाले असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जिल्ह्यातील पशुधन विभागाकडे लसीकरणासाठी लस उपलब्ध नसल्याने ६३४ पशु दगावल्याची तसेच लम्पी आजारामुळे मृत्यूमुखी पडलेल्या पशुधनाच्या मालकांना अद्यापही नुकसानभरपाई देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात आणखी किती पशुधनाचे लम्पी या चर्मरोगावरचे लसीकरण होणे बाकी आहे व त्याची कारणे काय आहेत, लम्पी आजारामुळे जनावरे दगावलेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत तसेच उर्वरित पशुधनाचे लसीकरण विहित वेळेत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) दिनांक २७/११/२०२३ अखेर राज्यातील एकूण १,३९,१७,२०५ पशुपधनास लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले आहे.

(२) लातूर जिल्ह्यात एकूण २,५७,५०८ गोवंशीय पशुधन असून, त्यापैकी २,५२,७९६ पशुधनास लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले आहे.

लातूर जिल्ह्यात एकूण ७०६ पशुधनाचा लम्पी चर्मरोग प्रादुर्भावामुळे मृत्यू झालेला असून, मृत पशुधनाच्या मालकांना नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही सुरू आहे. लातूर जिल्ह्यातील एकूण ३४९ मृत पशुंच्या मालकांना एकूण रुपये ७५.७६ लक्ष अर्थसहाय्याचे वाटप करण्यात आले असून, उर्वरित पशुपालकांना अर्थसहाय्य अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) सद्य:स्थितीत राज्यातील ९९.५० टक्के पशुधनास लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले असून, मृत पशुंच्या मालकांना अर्थसहाय्य अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

राज्यात ४.७६ लक्ष लसमात्रांचा बफर स्टॉक उपलब्ध असून, याद्वारे नवीन जन्मलेल्या वासरांना लसीकरण करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## वन विभागातील अधिकाऱ्याने बोगस जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्ती मिळविल्याबाबत

**(२८) * २१८१३ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सहायक वनसंरक्षक पदी दिनांक १२ डिसेंबर, २००५ रोजी रुजू झालेल्या अधिकाऱ्याने बनावट कागदपत्राच्या आधारे अनुसूचित जमातीच्या बोगस प्रमाणपत्राची वैधता करून सन २०११ मध्ये विभागीय वन अधिकारी व सन २०१९ मध्ये भारतीय वनसेवेत नियुक्ती मिळविली असून, रक्ताच्या नात्यातील ज्या भावाच्या प्रमाणपत्र आधारे त्यांनी वैधता प्राप्त केली त्याच भावाचे प्रमाणपत्र जात वैधता समिती, छत्रपती संभाजी नगर यांनी दिनांक ११ ऑक्टोबर, २००६ रोजी अवैध ठरवले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी तक्रारी दाखल झाल्यानंतर केलेल्या तपासणीत सदर अधिकाऱ्याने प्रमाणपत्र पडताळणी प्रकरणी सादर केलेल्या शाळेच्या दाखल्यांपैकी एक कन्या शाळा असून, दुसऱ्या शाळेत त्या अधिकाऱ्याने शिक्षण घेतले असल्याबाबतची कोणतीही नोंद उपलब्ध नाही, तसेच तिसऱ्या शाळेतील अभिलेखात जमातीचा उल्लेख करताना खाडाखोड असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रारी दाखल झाल्याने प्रमाणपत्र पुनर्निरीक्षण करणेकरीता दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी आदेश देण्यात देऊन त्यांची तपासणी पूर्ण झाली असताना देखील अद्याप निर्णय प्रलंबित ठेवला असल्याने आर्थिक गैरव्यवहार करून बोगस अधिकाऱ्यास लाभ मिळवून दिला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यास निलंबित करून त्यांचेकडून आतापर्यंत घेतलेलले सर्व लाभ वसूल करणेबाबत तसेच शासनास फसविल्याप्रकरणी गुन्हा नोंद करुन आर्थिक गुन्हे शाखेमार्फत त्यांची चौकशी करणे तथा विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर सक्त कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही, सहायक वनसंरक्षक पदावरुन भारतीय वन सेवेत पदोन्नतीने नियुक्ती मिळवीलेल्या वन विभागातील एक अधिकारी यांचेविरुध्द जात वैधता प्रमाणपत्र संदर्भात जात पडताळणी समिती, छत्रपती संभाजी नगर (किनवट) यांना तक्रारी प्राप्त झाल्याने जात पडताळणी समितीने त्यांच्याकडून खुलासा मागविला होता.त्यानुसार संबंधित अधिकारी यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, छत्रपती संभाजी नगर येथे रिट याचिका क्रमांक ३०५८/२०२० व्दारे आव्हान दिले असून सदर याचिकेमध्ये

मा.न्यायालयाने दिनांक २१ फेब्रुवारी, २०२० रोजी जात वैधता पडताळणी समिती, छत्रपती संभाजी नगर (किनवट) यांना कोणत्याही प्रकारचे अंतिम निर्णय पारित करु नये, असा अंतरिम आदेश दिलेला असून सदरील प्रकरण मा.उच्च न्यायालय खंडपीठ, छत्रपती संभाजी नगर येथे न्यायप्रविष्ट आहे.
(२) व (३) या मुद्यांबाबत हा विभाग अनभिज्ञ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) लागू नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्ह्यातील नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह मल्टीस्टेट बँकेतील ठेवीदारांच्या ठेवी परत मिळण्याबाबत

**(२९) * २१९९० प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकिंग व्यवसाय करण्यासाठी पुरेसे भांडवल नसल्याने अहमदनगर जिल्ह्यातील नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह मल्टीस्टेट बँकेचा परवाना रद्द केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बँकेत अनेक लघु उद्योजक, ज्येष्ठ नागरिक, चहाच्या टपरीधारकासारखे छोटे व्यावसायिक तसेच अन्य व्यावसायिक अशा अनेक ठेवीदारांच्या ठेवी परत मिळत नसल्याने ते मोठ्या आर्थिक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह मल्टीस्टेट बँकेतील सर्व ठेवीदारांच्या ठेवी परत देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) होय.

अहमदनगर जिल्ह्यातील नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह मल्टीस्टेट बँकेचा परवाना भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक ०४/१०/२०२३ रोजी रद्द केला आहे.
(२) व (३) उपरोक्त बँकेवर भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक ०६/१०/२०२१ रोजीच्या आदेशान्वये सर्वसमावेशक निर्बंध लावले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने नवीन ठेवी स्वीकारणे, सोने तारण ठेवणे किंवा कर्जांचे नुतनीकरण करणे या निर्बंधाचा समावेश आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्बंधापासून दिनांक २८/११/२०२३ पर्यंत बँकेच्या ६९७०५ खातेदारांना एकूण रुपये ३५१.९८ कोटींच्या ठेवींचे वाटप करण्यात आले आहे.

उपरोक्त बँकेचा परवाना रद्द केला असून सदर बँकेवर केंद्रीय निबंधक, नवी दिल्ली यांनी दिनांक ०८/११/२०२३ रोजी श्री.गणेश गायकवाड, उपसंचालक, राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ, पुणे यांची अवसायक पदी नियुक्ती केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्री क्षेत्र धुपेश्वर संस्थान (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) येथील पूर्णा नदीच्या पात्रातून अवैध वाळूचे उत्खनन होत असल्याबाबत

**(३०) * २१८६६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री क्षेत्र धुपेश्वर संस्थान (ता.मलकापुर, जि.बुलढाणा) येथील पूर्णा नदीच्या पात्रातून अवैध वाळू उत्खननामुळे नदीचे पात्र मोठे झाल्याने नदी पात्रातून करण्यात येणाऱ्या अवैध वाळू उपसा बंद करण्यात येऊन संबंधित वाळू माफियांवर कार्यवाही करण्यासाठी स्थानिक मा.लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, जळगाव व बुलढाणा यांचेकडे दिनांक १० ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू उपसा करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) श्री क्षेत्र धुपेश्वर संस्थान (ता.मलकापुर, जि.बुलढाणा) येथे पूर्णा नदीवर अवैध वाळू उत्खननामुळे नदीचे पात्र मोठे झाल्याने संस्थान परिसरातील नदी पात्रातून अवैध वाळू उपसा तात्काळ बंद करण्यात येवून संबंधित वाळू माफियांवर कार्यवाही करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १०/०८/२०२३ व अध्यक्ष, श्री क्षेत्र धुपेश्वर संस्थान, हरसोडा, ता.मलकापुर, जि.बुलढाणा यांनी दिनांक ०८/०८/२०२३ चे निवेदने जिल्हाधिकारी, जळगाव कार्यालयात प्राप्त झाले आहेत.

सदर निवेदनांच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी, जळगाव यांनी उपविभागीय अधिकारी, भुसावळ/मलकापुर व तहसिलदार, मुक्ताईनगर यांनी अवैध वाळु उत्खनन व वाहतूक संदर्भात संयुक्त मोहिम राबविण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तहसिलदार, मुक्ताईनगर यांच्या अहवालानुसार पथकास पुर्णा नदीपात्रातुन अंदाजित १५० ब्रास अवैध वाळू उत्खनन व वाहतूक केली असल्याचे निदर्शनास आल्याने तलाठी पिंप्राळा, ता.मुक्ताईनगर यांनी मुक्ताईनगर पोलीस स्टेशन येथे अज्ञात इसमाविरूध्द गुन्हा दाखल केलेला आहे. तर शेतकऱ्यांनी शेतामध्ये त्यांच्या शेतातून असलेल्या रस्त्यांनी वाळूचा उपसा करून चोरटी वाहतूक करण्यासाठी वापर होत असल्याने संबंधित शेतकऱ्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ४८(७) अन्वये नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे पूर्णा नदी पात्रातून अवैध वाळू उपसा करून मोठ्या प्रमाणात वाळू तस्करी होत असल्याबाबत उपसरपंच ग्रामपंचायत, काळेगांव ता.मलकापूर यांचे दिनांक ३१/०१/२०२३ चे निवेदन व अध्यक्ष, धुपेश्वर संस्थान यांचे दिनांक ०८/०८/२०२३ चे निवेदन जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना प्राप्त झाले. सदर निवेदनाच्या अनुषंगाने मलकापूर तालुक्यातील हरसोडा येथील श्री धुपेश्वर ते मलकापूर तालुक्याच्या हद्दीतील हरसोडा ते हिंगणानागपूर पर्यंत पूर्णा नदीकाठात येणारा सर्व परिसर पथकासह पाहणी केली असता कुठेही अवैध रेती उत्खनन केल्याचे दिसून आलेले नाही.

----------------

## राज्यातील मच्छिमार विविध योजनांपासून वंचित असल्याबाबत

**(३१)** * **२१६०३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मच्छिमारांचा विकास व्हावा यासाठी महाराष्ट्र मरीन सेंटरच्या माध्यमातून दर पाच वर्षांनी राज्यातील मच्छिमारांची जनगणना केली जात असून त्यानुसार शासनाकडून विविध योजना, पायाभूत सुविधा, विमा, नुकसान भरपाई तसेच मत्स्यव्यवसाय वाढविण्यासाठी संस्थामार्फत विविध उपक्रम राबविले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्रातील मच्छीमारांची शेवटची जनगणना सन २०१६ मध्ये झाली असून, तद्नंतर सदर जनगणना झाली नसल्याने शेकडो मच्छीमार शासकीय योजनांपासून वंचित राहत असून, शासनाने चुकीची आकडेवारी दिल्याचा आरोप मच्छिमार संघटनांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सात जिल्ह्यांमध्ये एक कोटीहून अधिक मच्छीमारांची संख्या असताना केवळ साडेतीन लाख मच्छीमारांची नोंद करण्यात आलेली असून त्यातही मासेमारी व्यतिरिक्त इतर व्यवसाय करणाऱ्यांची संख्या अधिक नोंदविण्यात आल्यामुळे मूळ मच्छीमार शासकीय योजनांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मच्छीमारांची जनगणना करण्याबाबत तसेच मच्छीमारी करणाऱ्या व मच्छीमारीशी निगडीत असणाऱ्यांना विविध लाभ मिळवून देण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) नाही.

मच्छिमार व मत्स्यव्यवसायिक यांची जनगणना केंद्रीय समुद्री मत्स्यकी अनुसंधान संस्था (CMFRI), कोचीन यांचेतर्फे केली जाते.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

मच्छिमारांची जनगणना ही केंद्रीय समुद्री मत्स्यकी अनुसंधान संस्था (CMFRI), कोचीन यांचेतर्फे केली जाते. सदरची जनगणना करताना मच्छिमारीशी निगडीत प्रत्येक बाबी विचारात घेतल्या जातात.

विभागांतर्गत केंद्र शासन व राज्य शासन यांचेतर्फे राबविण्यात येणाऱ्या मत्स्यव्यवसायाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याकरीता मच्छिमारांना प्रथम प्राधान्य दिले जाते. तसेच मच्छिमार व मत्स्यव्यवसाय संबंधित सर्व घटकांच्या विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधा पुरविणे, मच्छिमारांना शासनाच्या विविध योजनांद्वारे अर्थसहाय्य व तांत्रिक मार्गदर्शन पुरविण्याचे कार्य केले जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात वाळू धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत

**(३२)** * **२२०७३ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने माहे एप्रिल, २०२३ मध्ये वाळू धोरण जाहीर करून ग्राहकांना वाळू खरेदीसाठी प्रति ब्रास ६०० रुपये दरात वाळू उपलब्ध करून देखील प्रत्येक जिल्ह्यात उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करून वाळू गट निश्चितीचे प्रक्रिया प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धोरणाची प्रभावी अंमलबजावणी न झाल्यामुळे जळगाव, अहमदनगर, नाशिक, कोल्हापूर तसेच इतर अनेक जिल्ह्यांमध्ये वाळू तस्करीचे प्रकार मोठ्या प्रमाणात उघडकीस आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाळू धोरणाची प्रभावी अंमलबजावणी तसेच वाळू तस्करी रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) राज्यातील नागरिकांना स्वस्त दराने वाळू/रेती उपलब्ध करुन देणे व अनधिकृत उत्खननास आळा घालण्याच्या उद्देशाने शासनामार्फत रेती उत्खनन, साठवणूक, व्यवस्थापन व ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्री करण्याबाबतचे सर्वकष धोरण दिनांक १९/०४/२०२३ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केले आहे.

जळगाव जिल्ह्यातील २ वाळू डेपो (४ वाळू घाट) करीता प्रसिध्द केलेल्या निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने त्यापैकी ३ वाळूघाट एकूण २०३६२ ब्रास वाळू करीता शासकीय कामाकरीता उपलब्ध करुन दिले आहेत.

अहमदनगर जिल्ह्यात ४९ वाळू घाटाकरीता १५ वाळू डेपो तयार करुन सदर डेपोमधून ३५८४८ ब्रास वाळू वितरित केली आहे. तसेच, नाशिक जिल्ह्यात २ वाळू डेपो कार्यान्वित करुन ८६८८.५ ब्रास वाळू वितरित केली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील नद्या बारमाही पाण्याखाली असल्याने नदीपात्र कोरडे पडत नाही. पाण्याखालील वाळू/रेती उत्खननास मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने बंदी घातल्याने वाळू डेपो कार्यान्वित झालेले नाहीत. गाळ मिश्रित वाळू काढण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

सर्वंकष वाळू धोरणाच्या अनुषंगाने दिनांक १५/११/२०२३ पर्यंत राज्यातील २० जिल्ह्यात ४२७ वाळू घाटाकरीता एकूण ९१ वाळू डेपोची निर्मिती करुन एकूण ३६२७३९.९ ब्रास वाळूचे उत्खनन केले आहे.

गौण खनिजाच्या अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी महसूल, परिवहन व पोलीस यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात.

राज्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी दिनांक ३०/०६/२०२२ ते दिनांक १५/१०/२०२३ या कालावधीत एकूण १०५२६ प्रकरणात ४३५.४९ कोटी इतक्या दंडाची आकरणी करण्यात येवून ११८० गुन्हे दाखल करु ६७८ अरोपीना अटक केली आहे.

-----------------

## मौजे तुडाळ (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील अवैध उत्खननाबाबत

**(३३) * २२०३४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे तुडाळ (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील अवैध उत्खननाबाबत चौकशी करण्याबाबतचा निर्णय मा.महसूल मंत्री यांनी दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी झालेल्या बैठकीत घेतला असून उक्त प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती देण्याबाबतची लेखी मागणी मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक ०९ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त अवैध उत्खननाबाबत शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) लोकप्रतिनिधी यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने मा.मंत्री (महसूल) महोदय यांनी दिनांक २५/०३/२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांनी केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने वस्तूस्थितीदर्शक अहवाल संबंधित लोकप्रतिनिधी यांना जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक ०४/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविला आहे. तसेच, मौजे तुडाळ प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांनी मागणी केलेल्या अनुषंगाने दिनांक ०७/१२/२०२३ च्या शासन पत्रान्वये मार्गदर्शन कळविण्यात आले आहे. तसेच, या प्रकरणी दिवाणी न्यायालय, अलिबाग येथे दिवाणी दावा क्र.११६/२०१९ दाखल असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत

**(३४) * २२७८५ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ६ लाख ५६ हजार शेतकरी मागील सात वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेपासून वंचित असून सुमारे ५ हजार ९७५ कोटी रुपयांच्या कर्जमाफीच्या प्रतिक्षेत असल्याचे दिनांक १० नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजने' च्या लाभापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेमध्ये रुपये १.५० लाखापर्यंतच्या कर्जास कर्जमाफी, रुपये १.५० लाखावरील रक्कम शेतकऱ्यांनी बँकेकडे भरणा केल्यास त्यांना एकवेळ समझोता योजना (OTS) तसेच सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या वर्षामध्ये पीककर्जाची विहित मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रुपये २५ हजार पर्यंत प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येत आहे.

त्यानुसार सदर योजनेंतर्गत आतापर्यंत पात्र असलेल्या ४४.०४ लाख कर्जखात्यामध्ये रुपये १८,७६२ कोटी एवढी रक्कम वितरित करण्यात आली आहे. तसेच सदर योजनेसाठी सन २०२३-२४ मध्ये रुपये ५५.०० कोटी इतकी वित्तीय तरतूद करण्यात आली असून उर्वरीत तरतूदीच्या अनुषंगाने वित्त विभागास पुरवणी मागणी सादर करण्यात आलेली आहे.

तसेच काही तांत्रिक कारणांस्तव सदर योजनेची बंद असलेली संगणकीय प्रणाली सुरु करण्याबाबत महा-आयटी यांना सूचित केले आहे. त्यानुसार याबाबत महा-आयटीकडे शासनस्तरावरुन वारंवार पाठपुरावा केला जात आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कामण (ता.वसई, जि.पालघर) येथील अण्णासाहेब धामणे अनुदानित माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थ्याला केलेल्या मारहाणप्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याबाबत

**(३५) * २२०६० श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कामण (ता.वसई, जि.पालघर) येथील आदिवासी विकास विभागांतर्गत अण्णासाहेब धामणे अनुदानित माध्यमिक आश्रमशाळेतील आठवीच्या विद्यार्थ्याला आश्रमशाळेच्या अधीक्षक व शिक्षकाकडून दिनांक २ सप्टेंबर, २०२३ रोजी रात्री १० च्या सुमारास मारहाण केल्यामुळे धुंदलवाडी (जि.पालघर) येथील रुग्णालयात दाखल होऊन उपचार घ्यावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची चौकशी करुन संबंधित मारहाण करणाऱ्या अधीक्षक व शिक्षकावर योग्य ती कारवाई करण्यात येईल असे आदिवासी प्रकल्प शिक्षण विस्तार अधिकारी, डहाणू यांचेकडून सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सदर घटनेच्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणू यांनी दिनांक ११/०९/२०२३ रोजी चौकशी समिती गठीत केली. सदर चौकशी समितीने विद्यार्थ्यास प्रत्यक्ष भेट देऊन त्याच्या पालकांना घडलेल्या घटनेविषयी विचारणा केली असता सदर विद्यार्थ्याने श्री.पी.पी.बोरसे, अधीक्षक यांनी त्याच्या कंबरेत लाथ मारल्याने त्या ठिकाणी दुखत असल्याने तो वर्गात बसला नाही. ही घटना त्याच्या लहान बहिणीने पालकांना संपर्क करुन सांगितल्यानंतर विद्यार्थ्याचे पालक शाळेत आले व सदर घटना शाळा प्रशासनास सांगितल्यानंतर शाळा व्यवस्थापन विद्यार्थ्यावर प्राथमिक आरोग्य केंद्र, कामण येथे उपचारासाठी घेऊन गेले असल्याचे सांगितले.

प्रकल्प स्तरावर केलेल्या चौकशीअंती दोषी आढळलेले श्री.पी.पी.बोरसे, अधीक्षक यांना सेवेतून कमी करण्यात आले आहे.

(३) होय, कु. नितीन धनाजी मागी या मारहाण करण्यात आलेल्या विद्यार्थ्याला शाळेमार्फत प्राथमिक आरोग्य केंद्र कामण येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. सदर दवाखान्यामधून पुढील उपचारासाठी वसई विरार शहर महानगरपालिका रुग्णालय येथे उपचारासाठी नेण्यात आले. त्याठिकाणी विद्यार्थ्याचे एक्स-रे काढण्यात आले व औषोधोपचार देऊन सोडण्यात आले. त्यानंतर सदर विद्यार्थ्यास शाळेत परत आणण्यात येत होते. परंतु सदर विद्यार्थ्याच्या पालकांनी मुख्याध्यापक यांना लेखी निवेदन देऊन विद्यार्थ्यास स्वगावी घेऊन गेले व तेथे स्थानिक हाडवैद्यकडून उपचार सुरु केले. सदर कालावधीत शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्याच्या उपचारासंदर्भात त्याच्या पालकांशी संपर्क ठेवला होता.तद्नंतर दिनांक ०९/०९/२०२३ रोजी वेदांत रुग्णालय, धुंदलवाडी, ता.डहाणू, जि.पालघर व उपजिल्हा रुग्णालय, कासा येथे सदर विद्यार्थ्यांवर शाळा व्यवस्थापनाने उपचार केले. सदर विद्यार्थ्याची घरी देखभाल करण्यासाठी शाळा प्रशासनाने विद्यार्थ्याच्या घरी दररोज जाण्यासाठी शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्याची नियुक्ती केली होती. सदर विद्यार्थ्याची प्रकृती चांगली असून त्याला शासकीय माध्यमिक आश्रमशाळा सायवन, ता.डहाणू, जि.पालघर येथे इयत्ता ८ वी मध्ये निवासी विद्यार्थी म्हणून प्रवेश दिला आहे.

तसेच विद्यार्थ्याच्या पालकांनी केलेल्या तक्रारीनुसार वसई-विरार पोलीस आयुक्तालय, अंतर्गत नायगाव पोलीस ठाण्यामध्ये दोषी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात रोजगार हमी योजनेंतर्गत मृद व जलसंधारणाची कामे करण्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत

**(३६) * २२२५० श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २२ जिल्ह्यातील १४३ तालुके मृद व जलसंधारण तालुके म्हणून ओळखले जात असून पाण्याचे संवर्धन (Mission water conservation) योजनेंतर्गत तालुक्यांमध्ये पाण्याची साठवणूक करण्यासाठी विविध योजनांद्वारे मृद व जलसंधारण विभागाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत शासनाकडून निधी प्राप्त होवूनही सांगली, सोलापूर, वर्धा, अहमदनगर, बीड, रायगड व जळगांव इ. तालुक्यात अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे मृद व जलसंधारणाच्या योजनेची कामे सुरु करण्यात आलेली नाहीत अथवा सदरहू कामे संथगतीने सुरु असून त्यातील काही कामांमध्ये अनियमितता झाली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी मृद व जलसंधारणाची कामे करण्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करणाऱ्या व अनियमितता करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत Mission Water Conservation या अभियानाअंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांकरीता मृद व जलसंधारण विभागाकडुन निधी प्राप्त झालेला नाही. सदर कामे मनरेगा योजनेंतर्गत पूर्ण करण्यात येतात.

(२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत Mission Water Conservation या अभियानाअंतर्गत अनियमितता झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तसेच मृद व जलसंधारणाची कामे पावसाळा संपल्यानंतर व उक्त अभियानांतर्गत केंद्र शासनामार्फत कामांची सुधारीत यादी प्राप्त झाल्यानंतर सुरु करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोदवड व जामनेर (जि.जळगाव) तालुक्यातील शेतकऱ्यांनी सिंगल सुपर फॉस्फेट खताचा वापर केल्याने जमिनीसह शेतपिकाच्या झालेल्या नुकसानीची भरपाई मिळणेबाबत

**(३७) * २१८५७ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोदवड व जामनेर (जि.जळगाव) तालुक्यात सरदार अग्रो फर्टीलायझर्स ॲण्ड केमिकल्स प्रा.लि., गुजरात उत्पादीत सिंगल सुपर फॉस्फेट खताचा जमिनीत वापर केल्याने सुमारे १०४१.११ इतके क्षेत्र बाधित झाले असून ७९८ शेतकऱ्यांचे जमिनीसह शेतपिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याबाबत श्री.आबा पाटील, रा.मानमोडी, ता.बोदवड यांनी दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडे निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सरदार ॲग्रो फर्टीलायझर्स ॲण्ड केमिकल्स प्रा.लि. गुजरात या कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) मे.सरदार ॲग्रो फर्टीलायझर्स ॲण्ड केमिकल्स प्रा.लि., जळगाव या कंपनीचा परवाना दिनांक १७/०७/२०२३ रोजी निलंबित करण्यात आला आहे. तसेच या कंपनीविरुध्द पोलीस स्टेशन, जामनेर येथे गुन्हा एफआयआर क्रमांक ३३०/२०२३ हा दिनांक १७/०७/२०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे. परवाना अधिकारी, कृषी निविष्ठा तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जळगाव यांनी या प्रकरणी एक घाऊक विक्रेता व आठ किरकोळ विक्री केंद्राचे परवाने निलंबित केले आहेत. तसेच सदर कंपनीस नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणेसंदर्भात कृषी आयुक्तालयाकडून दिनांक ०६/११/२०२३ अन्वये आदेशित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तलासरी (जि.पालघर) येथील दापचरी भागातील दुग्ध प्रकल्प बंद झाल्याने कृषीक्षेत्रधारकांना जमिनी परत करण्याच्या नोटिसा बजाविल्याबाबत

**(३८) * २१६९० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) १९७४ पासून तलासरी (जि.पालघर) येथील दापचरी भागातील जमिनीचे वाटप करण्यात आले असून प्रत्येकी अडीच एकरचा प्लॉट गरजूंना देण्यात आला असून सदर प्लॉटवर गाईंचा गोठा, राहायला घर, भात शेतीसाठी जमीन व जनावरांना चारा अशी व्यवस्था निर्माण केली होती, परंतु दापचरी भागातील दुग्ध प्रकल्प बंद झाला असल्याने कृषीक्षेत्र धारकांना विश्वासात न घेता दिलेल्या जमिनी पुन्हा शासनाच्या ताब्यात द्या अशी मागणी प्रकल्प अधिकारी करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करारनामा संपुष्टात आल्याने या 'जमिनी परत करा' असे आदेश दिले असून, सदर जमिनीवाटप धारकांना फक्त पंधरा दिवसांची मुदत दिली आहे तसेच या कालावधीत जमिनीत परत केल्या नाहीत तर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांनी दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) शासनामार्फत पालघर जिल्ह्यातील दापचरी येथे दुग्ध प्रकल्पाची स्थापना करण्यात आली आहे. सदर प्रकल्पासाठी एकूण २६७७ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. सदर प्रकल्पात संलग्न पध्दतीची १७० कृषीक्षेत्र व १०० गावठाण पध्दतीचे क्षेत्र उभारण्यात आली आहेत. प्रत्येक कृषीक्षेत्रावर ९० आर. जमीन वाटप करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. त्यानुषंगाने दापचरी येथील क्षेत्रधारकांसोबत शासनाने सन १९७५-१९७६ मध्ये करारनामा केला होता.सदर क्षेत्र वाटप करतांना क्षेत्रधारकांना दुग्धव्यवसाय विभागामार्फत विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. उदा. घर, जनावरांसाठी गोठा, गुरांचा दवाखाना, पाणीपुरवठा आदी. सदर सोयीसुविधेपोटी शासन निर्णय दिनांक ०२/०२/२००१ अन्वये भाडे आकारणी करण्यात येते. दापचरी येथील दुग्धव्यवसाय क्षेत्रधारकांकडे उक्त सोयीसुविधेपोटी माहे मार्च, २०२३ अखेर सुमारे रुपये ३.०० कोटी थकबाकी प्रलंबित आहे.

कृषीक्षेत्रधारकांना प्रलंबित थकबाकी अदा करण्याबाबत व ज्या क्षेत्रधारकांचा करारनामा संपुष्टात आला आहे, अशा क्षेत्रधारकांच्या जमिनी ताब्यात घेण्याबाबत प्रकल्प अधिकारी, दापचरी यांच्यामार्फत दिनांक २५/०८/२०२३ रोजी संबंधितांना नोटीस देण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**नागपूर.** **सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.